आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषध निर्माणशास्त्र हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :पीसीआय-१०९९/(४१६/९९) तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ सप्टेंबर, १९९९.

संदर्भ :: (१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्रमांक :एफ ७४०-८९-९६१ -(पी) /इटी / ९९, दिनांक १/९/९९ चे पत्र.

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक १/९/१९९९ च्या पत्रान्वये आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषधनिर्माणशास्त्र हा पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासाठी काही अटी व शर्तीवर मंजूरी दिलेली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेता संबंधित संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून प्रस्तावित अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये संबंधित संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषध निर्माणशास्त्र हा पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच शासनाने दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल व संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्र शिक्षण संचालकांच्या संमतीने संस्थेकडून समाधानकारकरित्या करण्यात येतील.
३. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास संस्थेने आरोग्य विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे [illegible] भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

PRINCIPAL
K.T.Patil College of Pharmacy

२. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थेने प्रवेश आरोग्य विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत करण्यात देतील.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम, विषय नोंद वहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. ह. क्षीरसागर )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, आरोग्य विद्यापीठ, नाशिक
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
कार्यासन अधिकारी /तांश-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
संबंधित संस्थेस [illegible]

प्रत माहितीसाठी [illegible]

१. अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ) भारत शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आर. पी. इस्टेट, नवी दिल्ली-११० ००२
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार ( तांत्रिक ) भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय ( शिक्षण विभाग ), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल अॅशुरंस बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई [illegible]
३. निवड नस्ती, तांशि-१

शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**

**शासन निर्णय** क्र संकिर्ण-२०१०/(१८८/२०१०)/तांशि-४,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ३० जुलै, २०१०.

संदर्भः- १) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/ एनजीसी/अभातंशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०.

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/डीटीई/२०१०/ १३४३, दिनांक २७ जुलै, २०१०.

**शासन निर्णय** : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** प्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्र शिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनाक २७.७.२०१० च्या पत्रान्वये सादर केली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.



K. T. Patil College of Pharmacy

आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिनांक २९ व ३० जून, २०१० रोजी त्यांच्या संकेतस्थळावर सद्यःस्थितीत सुरु असलेल्या संस्थांना नवीन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेत बदल याची यादी जाहीर केली होती. ती संचालकांनी शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित केली होती. त्यानुसार शासनाची मान्यता काही संस्थांना देण्यात आली आहे. परंतु ज्या संस्थांची यादी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक २१ जून व २७ जुलै रोजी ई-मेलद्वारे सुधारित केली आहे, अशा संस्थांबाबत शासनाने दिनांक ३०.०६.२०१० रोजी निर्गमीत केलेले आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत.

४. **परिशिष्ट अ** येथे दर्शविलेल्या सर्व संस्थांचे सविस्तर पत्ते व विद्यापीठ यांची माहिती प्र. संचालकांनी शासनास ८ दिवसांत सादर करावी.

५. विद्यार्थ्यांना तसेच पालकांना व शैक्षणिक संस्थांना, अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता व संस्थेचा पत्ता इत्यादी संदर्भात काही शंका असल्यास त्यांचे निरसन संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (संचालकांमार्फत)
कुलसचिव, (संचालकांमार्फत)
संबंधित संस्था

**प्रत माहितीसाठी**

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती / तांशि-४

AICTE Approval 2010-2011 : Maharashtra State

Existing Institutions extension of approval, variation in intake, second shift [ Combined List of Institute communicated by e-mail on 21st and 27th July 2010 ]

| Appli no | Institute Name | Program | Level | Shift | Course | Current Intake (2009-10) | Applied Intake (2010-11) | Approved Intake (2010-11) | Diff |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1-5880923 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | CIVIL ENGG | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5880923 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | COMPUTER SCIENCE & ENGG | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5880923 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | ELECTRICAL / ELECTRONICS ENGG | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5880923 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | CHEMICAL ENGG | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5880923 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | PRODUCTION | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5881081 | ASPM's K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD. | PHARMACY | Under Graduate | First Shift | B.Pharm | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5881081 | ASPM's K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD. | PHARMACY | Post Graduate | First Shift | QUALITY ASSURANCE | 0 | 18 | 18 | 18 |
| 1-5881081 | ASPM's K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD. | PHARMACY | Post Graduate | First Shift | PHARMACOGNOSY | 0 | 18 | 0 | 0 |
| 1-5881081 | ASPM's K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD. | PHARMACY | Post Graduate | First Shift | PHARMACEUTICS | 0 | 18 | 18 | 18 |
| 1-5884721 | ASM's Institute Of Computer Studies | MCA | Post Graduate | First Shift | Master in Computer Application | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | Second Shift | Computer | 0 | 60 | 60 | 60 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | Second Shift | Electronics and Telecommunication | 0 | 60 | 60 | 60 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Mechanical Engineering | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Instrumentation & Control Engg | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Computer Science & Engineering | 120 | 120 | 120 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Post Graduate | First Shift | Instrumentation & Control Engg | 18 | 18 | 18 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Post Graduate | First Shift | Electronics and Communication | 18 | 18 | 18 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Electronics and Communication | 120 | 120 | 120 | 0 |
| 1-5901008 | Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Cummins College of Engineering For Women | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Information Technology | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5906481 | R.C.P.E.T's Institute of Management Research & DevelopmentShirpur | MCA | Post Graduate | First Shift | Master in Computer Application | 60 | 60 | 60 | 0 |
| 1-5911301 | Jagadambha College Of Engg & Technology | Engineering & Technology | Under Graduate | First Shift | Mechanical Engineering | 60 | 120 | 120 | 60 |

PRINCIPAL
ASPM'S K.T.Patil College of
Osmanabad-41350[illegible]

फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून फार्म.डी हा अभ्यासक्रम ३० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.....

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी, उस्मानाबाद

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१७/प्र.क्र.१३९/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दिनांक: २० एप्रिल, २०१७.

वाचा :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ५०-२४९/२०१६-PCI/५१२४५-४९, दिनांक १५.०७.२०१६.

२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ५०-२४९/२०१६-PCI/५३५३३-७७, दिनांक २०.१२.२०१६.

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी / फार्म.डी/२०१७/२९२, दिनांक ०६.०३.२०१७.

प्रस्तावना :

उपरोक्त वाचा १) येथील पत्रान्वये फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी, सिध्दार्थ नगर, बार्शी रोड, उस्मानाबाद-४१३ ५०१ या संस्थेस ३० प्रवेशक्षमतेचा फार्म.डी हा अभ्यासक्रम सुरु करण्यास काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असल्याने, उपरोक्त वाचा २) अन्वये फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता दिलेल्या मुदतवाढीस (Extension) अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी उपरोक्त वाचा ३) अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी, सिध्दार्थ नगर, बार्शी रोड, उस्मानाबाद-४१३ ५०१ या संस्थेस ३० प्रवेशक्षमतेचा फार्म.डी हा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासुन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी, सिध्दार्थ नगर,



K. T. Patil College of Pharmacy
Osmanabad.
Inward No. 9720
Date 25/05/2017
Signature of Inward Clerk

23/5/2017

बार्शी रोड, उस्मानाबाद-४१३ ५०१ या संस्थेस फार्म.डी हा अभ्यासक्रम ३० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत.तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच

विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०४२०१६४९५७३५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(म.मा.मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२.सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय , औरंगाबाद (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)

३.संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)

४.प्राचार्य, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी, सिध्दार्थ नगर, बार्शी रोड, उस्मानाबाद-४१३ ५०१

C:\users\manoj.kale\desktop\manoj\फार्मसी gr.docx

५.सचिव, फार्मसी काउन्सिल ऑफ इंडीया, कम्बाईड काउन्सिल्स बिल्डिंग , टेम्पल लेन, कोटला रोड, ऐलान-ए-गालिब मार्ग, पो.बॉ. नं. ७०२०, नवी दिल्ली-११० ००२.

६.सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

७.निवड नस्ती/तांशि-४.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यात विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नवीन पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास/ सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास/ विद्यमान डी.फार्मसी संस्थेत बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्यास/प्रवेशक्षमता पूर्ववत करण्यास/ विद्यमान अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमात विलीन करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.१९९/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०४ जून, २०१८

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१८/५७९, दिनांक ११.०५.२०१८ व सहपत्रे.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबतची यादी दिनांक ०७.०५.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उपलब्ध करुन दिली आहे. उपलब्ध करून दिलेल्या सदर यादीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ११/०५/२०१८ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे इत्यादी बाबत शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या उपरोक्त संदर्भीय प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र - अ (Annexure “A”), प्रपत्र - ब (Annexure “B”) व प्रपत्र -क

(Annexure “C”) मध्ये नमूद केलेल्या विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ (Annexture **“**A**”**) , प्रपत्र - ब (Annexture **“**B**”**) **व** प्रपत्र -क (Annexure “C”) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे या बाबींस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील .

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३ शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ,तंत्र शिक्षण ,महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/ संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५. संबंधित संस्थेने संचालक ,तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६. सदर पदवी , पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची दिनांक १०/१२/२०१४ ची अधिसूचना विचारात घेता, नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका व पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत. याकरीता " The Bachelor of Pharmacy ( B.Pharm ) Course Regulation, २०१४" मधील Chapter- II मधील क्र.९ येथील तरतुद पुढीलप्रमाणे असनू त्याचे पालन करणे आवश्यक राहील.

"No.Person, institution, Society, Trust or university shall start and conduct B. Pharm Programme without the prior approval of the Pharmacy council of India."

सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

९. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या

मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा.प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१२.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०४१२५१३१२२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( समीर ढेरे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई .
८. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
९. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
१०. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया
११. कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
१२. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१३. निवड नस्ती/तांशि-४.

Annexure A

Higher and Technical Education Department Government Resolution No. [illegible] Dated 04.06.2018

List of Increase in Intake/New Course and Restoration in existing institutes Approved by AICTE for A.Y. 2018-19

| SR NO | DTE CODE | AICTE CURRENT APPLICATION NO. | NAME OF THE INSTITUTE | INSTITUTE ADDRESS | District | Institution Type | PROGRAMME | AFFILIATING UNIVERSITY / DEPARTMENT | LEVEL OF COURSE | NAME OF THE COURSE | SHIFT | FULL TIME / PART TIME | APPROVED INTAKE 2017-18 | APPROVED INTAKE 2018-19 | VARIATION |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1284 | 1-3506832157 | DR. RAJENDRA GODE INSTITUTE OF PHARMACY, AMRAVATI | UNIVERSITY-MARDI ROAD, AMRAVATI | AMRAVATI | Unaided Private | PHARMACY | Sant Gadge Baba Amravati University, Amravati | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 50 | 100 | 50 |
| 2 | 2117 | 1-3508243195 | NAGNATHAPPA HALGE COLLEGE OF ENGINEERING | PARLI-BEED STATE HIGHWAY, AT BRAHMAWADI, POST. TOKWAD, TALUKA- PARLI-VAIJNATH, DIST. BEED | BEED | Unaided - Private | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 60 | 90 | 30 |
| 3 | 2151 | 1-3508427082 | ASPM'S K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD | SIDDHARTH NAGAR, BARSHI ROAD, OSMANABAD 41350 1(M S) | OSMANABAD | Unaided Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 4 | 2151 | 1-3508427082 | ASPM'S K. T. PATIL COLLEGE OF PHARMACY, OSMANABAD | SIDDHARTH NAGAR, BARSHI ROAD, OSMANABAD 41350 1(M S) | OSMANABAD | Unaided - Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad | POST GRADUATE | PHARM D. | 1st Shift | FULL TIME | 0 | 30 | 30 |
| 5 | 3109 | 1-3508246270 | K.J. SOMAIYA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES & RESERACH | VIDYANAGAR VIDYAVIHAR(E) MUMBAI | MUMBAI | Unaided - Private | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT (HEALTHCARE) | 1st Shift | FULL TIME | 0 | 30 | 30 |
| 6 | 3110 | 1-3508808387 | VIVEKANAND EDUCATION SOCIETY'S INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES AND RESEARCH | 495-497 COLLECTORS COLONY, NEAR MUMBIPAL SCHOOL, CHEMBER, MUMBHAI 400074 | MUMBAI | Unaided Private | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT ([illegible]) | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 7 | 3110 | 1-3508808387 | VIVEKANAND EDUCATION SOCIETY'S INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES AND RESEARCH | 495-497, COLLECTORS COLONY, NEAR MUMBIPAL SCHOOL, CHEMBER, MUMBHAI 400074 | MUMBAI | | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT | 1st Shift | FULL TIME | 60 | 120 | 60 |